जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.

<u>जाहीर निविदा.</u>

जळगांव जिल्हयातील तमाम कार्यालयीन उपयोगाचे संगणक प्रिंटर्सचे टोनर कार्टेज पुरविणा–या पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयाच्या उपयोगाकरीता लागणारे संगणक प्रिंटर्सचे टोनर कार्टेज खरेदी करावयाचे आहेत. तरी याकामी ज्या पुरवठाकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफ्यात म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या <u>नावाने पाकिटावर "संगणक प्रिंटर्सचे टोनर कार्टेज "</u> असे नमुद करुन पाकीटे म. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 22/12/2025 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 23/12/2025 रोजी म. जिल्हा व सत्र न्यायाधीश 1, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

<u>कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे संगणक प्रिंटर्सचे टोनर कार्टेज खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.</u>

Particulars	Required Cartridge
Canon LBP151 dw Laser Printer Pks (Cartridege 337)	50
Canon LBP 161dn Laser Printer required toner (051) with drum unit	05
Canon Cartridge 070 Black	100

<u>सर्वसाधारण अटी.</u>

1 दरपत्रक स्विकृत केल्यावर आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा <u>Genuine (Original)</u> असावा नसल्यास पुरवठा स्विकारला जाणार नाही.

2 सदरचे साहित्य कार्यालयीन वेळेत कार्यालयात स्वखर्चाने पोहोचवून द्यावे लागतील.

3 दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

4 सदरील साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयात पोहोचवून दिलेवर उधारीचे देयक तीन प्रतीत त्वरीत सादर करावे.

5 दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्सचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस अधीन राहून दरपत्रक दयावे लागेल. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यात येईल.

.....2

6 <u>उपरोक्त साहित्य अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत</u>. उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

7 दरपत्रक उघडण्याच्या नमुद दिवशी व वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा आपले प्रतिनिधी पाठवावे अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

8 दरपत्रकातील दर दिनांक 31 / 03 / 2026 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

9 नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवलेला आहे.

म.जा.क. / ६८२४ / 2025
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक 10 / 12 / 2025.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर.